भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २२.०४.२०२० ते २६.०४.२०२०)

| अंक ३१/२०२० | दिनांक २१.०४.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१४/०४/२०२० ते २०/०४/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २२/०४/२०२० ते २६/०४/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | दिनांक | | २२/०४ | २३/०४ | २४/०४ | २५/०४ | २६/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३७.५ | ३७.० | ३७.० | ३७.० | ३७.० | ३७.० | ३८.० | कमाल तापमान (अं. से) | | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| २४.० | २५.० | २३.० | २३.० | २५.० | २५.० | २६.० | किमान तापमान (अं. से) | | २५ | २४ | २४ | २४ | २४ |
| निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ४ | ४ | ३ | १ | ० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ८४ | ९२ | ९२ | ८४ | ८५ | ८४ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७३ | ९० | ९० | ९० | ७९ |
| ४१ | ३९ | ४३ | ४७ | ४७ | ४१ | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४१ | ३८ | ४३ | ३८ | ४३ |
| १.९ | २.० | २.२ | २.६ | २.२ | २.० | २.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ५ | ३ | ६ | ९ | १० |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | उत्तर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडे | आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे |
| उत्तरोत्तर ईशान्य | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तर | उत्तर | उत्तरोत्तर ईशान्य | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसात तापमानामध्ये घट होऊन हवामान कोरडे व ढगाळ राहण्याची शक्यता आहे त्याचबरोबर हवेचा वेग वाढण्याची शक्यता आहे असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून वर्तविण्यात आला आहे

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीमध्ये शेतीचे नियोजन | | महाराष्ट्र शासन कृषि विभाग कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) देवगड जि सिंधुदुर्ग, यांच्यामार्फत देवगड तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपणी यांना कळविणेत येते कि कृषि विभाग व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा देवगड जि सिंधुदुर्ग यांचे मार्फत शेतकरी ते ग्राहक थेट विक्रि बाबत नियोजन करणेत येत आहे. इतर जिल्हातील कृषि विभाग, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपणी यांचेशी आंबा विक्रि बाबत चर्चा सुरु आहे. तरी ज्या आंबा उत्पादक शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपणी यांना इतर जिल्हात आंबा विक्रि करावयाचे आहे त्यांनी कृषि विभाग यांचेशी संपर्क करावा. तसेच इतर जिल्हयातील जिवणावश्यक वस्तु उदा. भाजीपाला केळी, कांदा व इतर फळे यांची देवेणघेवाण करावी असे अपेक्षित आहे. तरी सदर विक्रि व खरेदी बाबत इच्छुक शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपणी यांनी संपर्क करावा. अधिक माहितीसाठी संपर्क श्री निकेतन राणे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) देवगड, तालुका कृषि अधिकारी कार्यालय देवगड, यांच्याशी संपर्क साधावा. संपर्क क्रमांक 9404395984 8623895984 |
| आंबा | फळविकास ते काढणी | जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढ्णीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दूपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बुरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देऊन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे. |
| काजु | काढणी | काजुमध्ये काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती ऊन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | फळधारणा | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार द्यावा. त्याचबरोबर उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| वायंगणी भात | दाना भरण अवस्था ते पक्वता | काही ठिकाणी भात पीक हे दाना भरण्याच्या अवस्थेत आहे. भात पिकाला नियमितपणे ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे<br>भाताच्या काही जातींमध्ये भात पीक कापनीच्या अवस्थेत आहे. कापणीपूर्वी ८ ते १० दिवस अगोदर शेतातील पाणी काढून दयावे. तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वैभव विळ्याच्या साहायाने जमिनीलगत करावी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये |
| भुईमुग | शेंगांचा विकास ते काढणी | तापमानाबरोबर बाष्पीभवनामधध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकाला पेरणीनंतर १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याचच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पिवळी होऊन गळु लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळ्वुन नंतर साठवणुक करावी. |
| सूर्यफूल | काढ्णी | काही ठिकाणी सुर्यफुल पीक तयार झालेले आहे. वाळलेली फुले विळ्याने कापुन ऊन्हात वाळवावी आणि शक्य असल्यास मशीनच्या सहाय्याने अथवा काठीने दांड्कून दाणे वेगळे करावेत. उफणणी करुन दाणे स्वच्छ करावेत आणि ऊन्हात वाळवून साठवुन ठेवावेत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|